# 25 ठाणे लोकसभा मतदार संघ

**146 ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघ, भाईंदर (प.),**
**महामानव शिव शाहु फुले आंबेडकर स्मृती सभागृह,बेथनी**
**हॉस्पीटलच्या बाजुला पोखरण रोड न.02 ठाणे(प) 400606**
**EMAIL ID : 146election2024@gmail.com**

**जा.क्र./निवडणुक/कावि- 19 /2023-24** **दि. 15/05/2024**

निवडणुक तात्काळ

## // प्रसिध्दी पत्रक //

25 ठाणे लोकसभा मतदार संघामधील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघ कार्यक्षेत्रातील मा. सहा. निवडणुक निर्णय अधिकारी श्रीम. शितल देशमुख, नोडल अधिकारी तथा उपायुक्त (शिक्षण), श्रीम. वर्षा दिक्षित यांच्या मार्गदर्शनानुसार 25 ठाणे लोकसभा मतदार संघातील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघात मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रात दि.12/04/2024 रोजी जेसल पार्क चौपाटी , भाईंदर पुर्व येथे सकाळी 10.00 ते 11.30 वाजे पर्यंत स्वीप (sveep) अंतर्गत तसेच साय. 7.00 ते 8.00 दरम्यान मनपाच्या मोबाईल व्हॅन दवारे आर.एन.ए. कॉम्पलेक्स, मिरारोड पुर्व येथे चित्रफित प्रसारीत करुन जनजागृती करण्यात आली.

146 ओवळा माजिवडा विधान सभा मतदार संघातील स्वीप (sveep) पथकातील कर्मचारी यांनी फुटबॉल खेळाडु, बॅडमिंटन खेळाडु, प्रेक्षक व नागरीक यांना मतदार नोंदणी व मतदान जनजागृती संदर्भात माहीती देवुन दि. 20/05/ 2024 सोमवार या दिवशी आपल्या कुटुंबियांस (आई,वडील,भाउ,बहीण, मित्र व शेजारी) मतदान करण्यास प्रोत्साहीत करावे असे आवाहान केले मतदान नोंदणी संदर्भात माहीती दिली.

साय. 7.00 ते 8.00 दरम्यान सेंट झेवियर्स शाळे जवळ, भाजी मार्केट ,आर.एन.ए. कॉम्पलेक्स ,मिरारोड पुर्व येथे सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी मोबाईल व्हॅन उभी करुन अभिनेता जितेंद्र यांची मतदान करा या संदर्भातील चित्रफित प्रसारीत करुन जनजागृती करण्यात आली.

सदर कार्यक्रमास 146 ओवळा माजिवडा विधान सभा मतदार संघातील (sveep) पथकातील कर्मचारी वर्ग तसेच यांनी फुटबॉल खेळाडु, बॅडमिंटन खेळाडु, प्रेक्षक व नागरीक मोठया प्रमाणात उपस्थीत होते.

सर्वांनी मतदार नोंदणी करुन दि.20/05/2024 रोजी सर्वांनी मतदान करावे तसेच मतदार नोंदणी व मतदार जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमास सहकार्य केल्या 146 ओवळा माजिवडा विधान सभा मतदार संघातील स्वीप (sveep) पथकाने सर्व उपस्थीत खेळाडु व नागरीक यांचे आभार मानले.

(रवी पवार)
उपायुक्त(मु.) तथा जिल्हा नोडल अधिकारी
स्वीप 146 ओवळा माजीवडा वि.म.स.